सकाळ

• सातारा, मंगळवार, २८ जानेवारी २०२०

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# मतदानाची जागृती करणे प्रत्येकाचे कर्तव्य : नलावडे

**कोरेगाव, ता. २७ :** देशाचे भवितव्य युवक, युवतींच्या हाती असून, मतदान व त्याबाबतची जागृती करणे, प्रत्येक नागरिकाचे प्रथम कर्तव्य आहे आणि ते सर्वांनी पार पाडले पाहिजे, असे प्रतिपादन प्रांताधिकारी कीर्ती नलावडे यांनी केले.

मतदार दिनानिमित्त येथे शालेय विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. डी. पी. भोसले महाविद्यालय, मॉडर्न इंग्लिश स्कूल, सरस्वती विद्यालयासह विविध ठिकाणी जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन केले होते. निवडणूक काळामध्ये उत्कृष्ट काम केल्याबद्दल डी. पी. भोसले महाविद्यालयातील 'एनसीसी'च्या विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रे देण्यात आली. त्या वेळी श्रीमती नलावडे बोलत होत्या. याप्रसंगी तहसीलदार रोहिणी शिंदे, गटविकास अधिकारी क्रांती बोराटे, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, उपप्राचार्य जाधव, नायब तहसीलदार श्रीरंग मदने, मंडल अधिकारी किशोर धुमाळ, तलाठी शंकरराव काटकर, अंकुश घोरपडे, प्रा. भोसले, प्राचार्य चव्हाण आदी प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांना मतदान करण्यासंदर्भात शपथ देण्यात आली. दरम्यान, महाविद्यालयापासून जनजागृती रॅली काढण्यात आली, तसेच सरस्वती हायस्कूलमध्ये रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते.



**कोरेगाव : 'एनसीसी'च्या विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रे देताना कीर्ती नलावडे, शेजारी रोहिणी शिंदे, क्रांती बोराटे, श्रीरंग मदने आदी.**

**(छायाचित्र : अधिक बर्गे)**